RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक १६] मंगळवार, मे २०, २०२५/वैशाख ३०, शके १९४७ [पृष्ठे ८, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ३३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### नगर विकास विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २० मे, २०२५

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९.**

क्रमांक एमसीओ-२०२४/प्र.क्र.१८१/नवि-१४.- ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२४ (सन २०२४ चा महा. २३) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा महा. ५९) यामध्ये सुधारणा करण्यात आली असून त्याद्वारे महानगरपालिकेतील प्रत्येक प्रभागांमध्ये शक्य असेल तेथवर चार पालिका सदस्य, परंतु तीनपेक्षा कमी नाहीत व पाचपेक्षा अधिक होणार नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील अशी तरतूद करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त तरतुदी अंमलात आणण्याच्या उद्देशाने महिलांकरिता तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यातील व्यक्तींकरीता महानगरपालिकेमधील प्रभागांमध्ये पालिका सदस्यांच्या राखीव जागांचे वाटप करण्याच्या आणि त्या चक्रानुक्रमे फिरविण्याच्या संबंधात नियम करणे इष्ट वाटते;

आणि ज्याअर्थी, याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यासाठी या नियमांची पूर्वप्रसिध्दीची शर्त काढून टाकणे, जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा महा. ५९) कलम ५अ आणि कलम ४५६-अ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि यासंदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून तसेच यासंदर्भात अगोदर काढलेल्या इतर सर्व अधिसूचना, आदेश, नियम, इत्यादींचे अधिक्रमण करुन, महाराष्ट्र शासन, राज्य निवडणूक आयुक्तांशी विचार विनिमय केल्यानंतर, याद्वारे पुढील नियम करीत आहे, ते असे :-

**१. संक्षिप्त नाव.-** या नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२५ असे म्हणण्यात येईल.

२. **व्याख्या.**-(एक) या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर;

(अ) "अधिनियम"याचा अर्थ, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा महा. ५९) असा आहे;

(ब) "प्रभाग" याचा अर्थ, पालिका सदस्यांना निवडून देण्याच्या प्रयोजनार्थ, महानगरपालिकेचे क्षेत्र ज्या प्रादेशिक मतदार संघांमध्ये विभागलेले असेल त्यांच्यापैकी प्रादेशिक मतदार संघ, असा आहे.

(दोन) या नियमांमध्ये वापरलेले, परंतु या अगोदर व्याख्या न केलेले शब्द व शब्द प्रयोग यांना अधिनियमामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

३. **अनुसूचित जातींसाठी राखून ठेवलेल्या जागांचे वाटप करण्याची व त्या चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत.**- (१) अनुसूचित जातींच्या व्यक्तींसाठी महानगरपालिका सदस्यांच्या जागा राखून ठेवण्याकरिता, प्रथम प्रभागांची मांडणी ही, ज्या प्रभागातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी त्या प्रभागातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक असेल अशा प्रभागापासून सुरुवात करुन, उतरत्या क्रमाने करण्यात येईल.

(२) जेथे अनुसूचित जातीच्या व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या महानगरपालिका सदस्यांच्या जागांची संख्या, महानगरपालिकेतील प्रभागांच्या संख्येइतकी किंवा कमी असेल तेथे, प्रत्येक प्रभागातील एक जागा ही, अनुसूचित जातींच्या लोकसंख्येची टक्केवारी सर्वाधिक असलेल्या प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने अनुसूचित जातींसाठी नेमून देण्यात येईल;

परंतु महानगरपालिकेच्या सर्व प्रभागांमध्ये असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविले जाईपर्यंत, ज्या प्रभागात अनुसूचित जातींसाठी अशी कोणतीही जागा यापूर्वी राखून ठेवलेली नव्हती अशा प्रभागांकरिता, महानगरपालिकेच्या पुढील निवडणुकांमध्ये, शक्य होईल तेथवर, या पोट-नियमाखाली राखून ठेवलेल्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

(३) जेथे अनुसूचित जातीच्या व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या महानगरपालिका सदस्यांच्या जागांची संख्या ही महानगरपालिकेतील प्रभागांच्या संख्येपेक्षा जास्त असेल,–

(अ) त्यावेळी प्रथम, प्रत्येक प्रभागातील एक जागा अनुसूचित जातींसाठी नेमून देण्यात येईल; आणि

(ब) यानंतर, उर्वरित राखीव जागा नेमून देण्याच्या प्रयोजनासाठी, अनुसूचित जातींसाठी राखून ठेवावयाच्या सर्व जागा नेमून दिल्या जाईपर्यंत, अनुसूचित जातींच्या लोकसंख्येची टक्केवारी सर्वाधिक असलेल्या प्रभागांपासून सुरुवात करून उतरत्याक्रमाने प्रभागातील आणखी एक जागा, अनुसूचित जातीसाठी नेमून देण्यात येईलः

परंतु महानगरपालिकेच्या सर्व प्रभागांमध्ये, असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविले जाईपर्यंत, ज्या प्रभागात अनुसूचित जातींसाठी केवळ एकच जागा यापूर्वी राखून ठेवलेली होती अशा प्रभागांकरिता, महानगरपालिकेच्या पुढील निवडणुकांमध्ये, शक्य होईल तेथवर, या पोट-नियमाखाली राखून ठेवलेल्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

४. **अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवलेल्या जागांचे वाटप करण्याची व त्या चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत.**- (१) अनुसूचित जमातीच्या व्यक्तींसाठी महानगरपालिका सदस्यांच्या जागा राखून ठेवण्याकरिता, प्रथम प्रभागांची मांडणी ही, ज्या प्रभागातील अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येची टक्केवारी त्या प्रभागातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक असेल अशा प्रभागापासून सुरुवात करुन, उतरत्या क्रमाने करण्यात येईल.

(२) जेथे अनुसूचित जमातीच्या व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या महानगरपालिका सदस्यांच्या जागांची संख्या, महानगरपालिकेतील प्रभागांच्या संख्येइतकी किंवा कमी असेल तेथे, प्रत्येक प्रभागातील एक जागा ही, अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येची टक्केवारी सर्वाधिक असलेल्या प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने अनुसूचित जमातींसाठी नेमून देण्यात येईल;

परंतु महानगरपालिकेच्या सर्व प्रभागांमध्ये असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविले जाईपर्यंत, ज्या प्रभागात अनुसूचित जमातींसाठी अशी कोणतीही जागा यापूर्वी राखून ठेवलेली नव्हती अशा प्रभागांकरिता, महानगरपालिकेच्या पुढील निवडणुकांमध्ये, शक्य होईल तेथवर, या पोट-नियमाखाली राखून ठेवलेल्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

(३) जेथे अनुसूचित जमातीच्या व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या महानगरपालिका सदस्यांच्या जागांची संख्या ही महानगरपालिकेतील प्रभागांच्या संख्येपेक्षा जास्त असेल,-

(अ) त्यावेळी प्रथम, प्रत्येक प्रभागातील एक जागा अनुसूचित जमातींसाठी नेमून देण्यात येईल; आणि

(ब) यानंतर, उर्वरित राखीव जागा नेमून देण्याच्या प्रयोजनासाठी, अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवावयाच्या सर्व जागा नेमून दिल्या जाईपर्यंत, अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येची टक्केवारी सर्वाधिक असलेल्या प्रभागांपासून सुरुवात करून उतरत्याक्रमाने प्रभागातील एक जागा, अनुसूचित जमातीसाठी नेमून देण्यात येईलः

परंतु महानगरपालिकेच्या सर्व प्रभागांमध्ये, असे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविले जाईपर्यंत, ज्या प्रभागात अनुसूचित जमातींसाठी केवळ एकच जागा यापूर्वी राखून ठेवलेली होती अशा प्रभागांकरिता, महानगरपालिकेच्या पुढील निवडणुकांमध्ये, शक्य होईल तेथवर, या पोट-नियमाखाली राखून ठेवलेल्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

५. **नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागांचे वाटप करण्याची व त्या चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत.–** (१) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या पालिका सदस्यांच्या जागा पुढे दिलेल्या पध्दतीने प्रभागांमध्ये नेमून देण्यात येतील :-

(अ) प्रथम, प्रत्येक प्रभागाकरीता एक जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता नेमून देण्यात येईलः

परंतु, जर तीन जागा असलेल्या एखाद्या प्रभागातील दोन जागा ह्या अगोदर अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवलेल्या असतील तर, असा प्रभाग हा या खंडानुसार व पुढील खंड (दोन) नुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा नेमून देण्याकरीता विचारात घेण्यात येणार नाही.

(ब) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या उर्वरित जागा, कोणत्याही असल्यास, पुढील पध्दतीने नेमून देण्यात येतील ती अशी–

(एक) जेथे पाच सदस्यांचा प्रभाग असेल आणि, त्या प्रभागात, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी दोनपेक्षा अधिक होणार नाहीत इतक्या एकूण जागा राखून ठेवलेल्या असतील तेथे, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी आणखी एक जागा त्या प्रभागात नेमून देण्यात येईल.

(दोन) खंड (अ) आणि उप खंड (एक) यांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे जागांचे वाटप केल्यानंतर, जर तेथे नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी नेमून द्यावयाच्या आणखी काही जागा शिल्लक असतील तर, ज्या प्रभागातील किमान तीन जागा बिनराखीव राहीलेल्या असतील त्या प्रभागांमधून सोडतीने या जागा नेमून देण्यात येईल.

(तीन) खंड (अ) आणि उप खंड (दोन) यांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे जागांचे वाटप केल्यानंतर, जर तेथे नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी नेमून द्यावयाच्या आणखी काही जागा शिल्लक असतील तर, ज्या प्रभागातील किमान दोन जागा बिनराखीव राहीलेल्या असतील त्या प्रभागांमधून सोडतीने या जागा नेमून देण्यात येईल.

(चार) खंड (अ) आणि उप खंड (तीन) यांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे जागांचे वाटप केल्यानंतर, जर तेथे नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी नेमून द्यावयाच्या आणखी काही जागा शिल्लक असतील तर, ज्या प्रभागातील किमान एक जागा बिनराखीव राहीलेल्या असतील त्या प्रभागांमधून सोडतीने या जागा नेमून देण्यात येईल.

(२) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता अशाप्रकारे राखून ठेवलेल्या जागा, शक्य तेथवर, ज्या प्रभागांमध्ये अगोदरच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवण्यात आली नव्हती, अशा प्रभागांसाठी जोपर्यंत महानगरपालिकेतील प्रत्येक प्रभागामध्ये चक्रानुक्रमे फिरविले जात नाही तोपर्यंत, महानगरपालिकेच्या त्यानंतरच्या निवडणुकांमध्ये चक्रानुक्रमे फिरविण्यात येतील.

६. **महिलांसाठी जागा नेमून देण्याची व त्या चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत.–** (१) एखाद्या प्रभागात महिलांसाठी राखून ठेवावयाच्या महानगरपालिका सदस्यांच्या जागांची संख्या ही खालीलप्रमाणे असेल :–

(अ) तीन किंवा चार जागा असलेल्या प्रभागातील दोन जागा ही महिलांसाठी राखून ठेवण्यात येईलः

परंतु, प्रत्येकी तीन जागांचे दोन प्रभाग असलेल्या महानगरपालिकेत, तीन जागांच्या एका प्रभागामधील दोन जागा महिलांकरीता

राखून ठेवण्यात येतील आणि तीन जागांच्या दुसऱ्या प्रभागांमधील एक जागा महिलांकरीता राखून ठेवण्यात येईल. आणि असे करताना या तीन जागांच्या दोन प्रभागांपैकी कोणत्या प्रभागात पहिल्या निवडणूकीच्यावेळी महिलांकरीता दोन जागा असतील हे या दोन प्रभागांतून सोडतीने निश्चित करण्यात येईल आणि ही परिस्थिती पुढील निवडणूकीत उलट होईल.

(ब) पाच जागा असलेल्या प्रभागातील तीन जागा महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(२) कलम ५अ च्या पोट-कलम (१) च्या दुसऱ्या परंतुकाच्या आणि पोट-कलम (१) च्या तरतूदींच्या अधिन राहून अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा पुढील प्रकारे राखून ठेवण्यात येतील :—

(अ) प्रथम, अनुसूचित जातीतील महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा या, अनुसूचित जातीसाठी राखीव जागा असलेल्या प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

(ब) यानंतर अनुसूचित जमातीतील महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा या, अनुसूचित जमातीसाठी राखीव जागा असलेल्या प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

(३) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा उपरोक्त पोट-नियम (१) च्या अधिन राहून पुढील रीतीने राखून ठेवण्यात येतील :—

(अ) प्रथम ज्या प्रवर्गामध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता दोन जागा राखीव असतील त्या प्रभागामधील एक जागा थेट नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांकरिता राखून ठेवण्यात येईल.

(ब) त्यानंतर, ज्या प्रभागांमध्ये एक किंवा अधिक जागा एकतर अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा दोन्हीकरीता राखीव असतील, परंतु त्या जागा, त्या प्रवर्गातील महिलांकरीता राखीव नसतील तर, अशा प्रभागांतील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची जागा महिलांकरिता राखून ठेवण्यात येईल.

(क) अशाप्रकारे जागा नेमून दिल्यानंतर, जर नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांकरिता राखील असलेल्या कोणत्याही जागा शिल्लक राहात असतील तर, त्या जागा खंड (अ) आणि खंड (ब) यांमध्ये नमूद केलेले मात्र, पाच जागा नसलेले प्रभाग आणि ज्या प्रभागांमध्ये पोट-नियम (१) अनुसार अशा आरक्षणासाठी विहीत केलेल्या संख्यात्मक मर्यादेपर्यंत महिलांसाठी अगोदरच जागा राखून ठेवलेल्या असतील असे प्रभाग वगळून, उर्वरित प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

(४) एकदा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांकरिता समुचित प्रभागांमध्ये जागा राखून ठेवण्यात आल्यानंतर, महिलांकरिता राखीव असलेल्या उर्वरित जागा, ज्या प्रभागांमध्ये पोट-नियम (१) च्या तरतूदींच्या अधिनतेने महिलांचे आरक्षण पूर्ण करण्याकरीता आवश्यक असतील त्या मर्यादेपर्यंत नेमून देण्यात येतील.

(५) या नियमांच्या प्रारंभानंतरच्या पुढील निवडणूकीमध्ये, शक्य असेल तेथवर, सर्व प्रभागांमध्ये असे महिलांचे आरक्षण चक्रानुक्रमे नेमून दिले जाईपर्यंत, महानगरपालिकेच्या यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये एखाद्या विशिष्ट प्रवर्गातील महिलांसाठी जेथे अशी कोणतीही जागा नेमून देण्यात आली नव्हती त्या प्रभागांसाठी, त्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव जागा चक्रानुक्रमे नेमून देण्यात येतील.

७. **चक्रानुक्रमासाठी प्रथम निवडणूक.**— ह्या नियमानुसार चक्रानुक्रमाच्या प्रयोजनांसाठी, या नियमांच्या प्रारंभानंतर घेतलेल्या सार्वत्रिक निवडणुका ह्या, प्रथम निवडणूक असल्याचे मानण्यात येईल.

८. **सर्वसाधारण तरतूद.**— जेथे, ज्या प्रभागामध्ये, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरीता जागांचे वाटप करताना ५० टक्क्यांपेक्षा जास्त जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत, तेथे नंतरच्या निवडणूकीमध्ये, शक्यतोवर अशा जागा महानगरपालिकेच्या इतर प्रभागांमध्ये चक्रानुक्रमे फिरविण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रियांका कुलकर्णी-छापवाले,**
शासनाच्या उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Date 20th May, 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949.

No. MCO-2024/C.R.181/UD-14.–Whereas, by the Maharashtra Municipal Corporations (Amendment) Act, 2024 (Mah. XXIII of 2024), the Maharashtra Municipal Corporations Act (LIX of 1949) has been amended to provide that each of the wards shall elect as far as possible four Councillors, but not less than three and not more than five Councillors;

And Whereas, to give effect to the said provisions, it is considered expedient to frame the rules regarding the manner of allotment and rotation of reservation of seats of Councillors in wards in the Corporation for Women and the persons belonging to the Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of citizens;

And Whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action in this behalf by dispensing with the condition of previous publication of these rules;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 5A read with section 456A of the Maharashtra Municipal Corporations Act (LIX of 1949), and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all earlier notifications, orders, rules, etc., issued previously in this behalf, the Government of Maharashtra, after consultation with the State Election Commissioner, hereby makes the following rules, namely :—

**1.** *Short title*.—These rules may be called the Maharashtra Municipal Corporations (Manner of Allotment and Rotation of Reservation of Seats of Councillors in Wards) Rules, 2025.

**2.** *Definitions*.—(1) In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) "Act" means the Maharashtra Municipal Corporations Act(LIX of 1949) ;

(*b*) "ward" means the territorial constituencies into which the area of the Corporation is divided for the purpose of election of Councillors;

(2) Words and expressions used in these rules but not defined hereinabove shall have the same meanings as assigned to them in the Act respectively.

**3.** *Manner of allotment and rotation of seats reserved for the Scheduled Castes*.— (1) For reserving seats of Councillors for the persons belonging to the Scheduled Castes, the wards shall be first arranged in descending order, beginning with a ward where the percentage of population of the Scheduled Castes with regard to the total population of such ward is the highest.

(2) Where the number of seats of Councillors to be reserved for the persons belonging to the Scheduled Castes is equal to or less than the number of wards in a Corporation, one seat in each ward shall be allotted to the Scheduled Castes, beginning in the descending order with the ward having the highest percentage of population of the Scheduled Castes:

Provided that, the seats reserved under this sub-rule shall be rotated, as far as possible, in the subsequent elections of the Corporation, to such wards in which no such seat had been previously reserved for the Scheduled Castes until such reservation is provided in all the wards in the Corporation by rotation.

(3) Where the number of seats of Councillors to be reserved for the persons belonging to the Scheduled Castes, is more than the number of wards in a Corporation,—

(*a*) then firstly, one seat in each ward shall be allotted for the Scheduled Castes; and

(*b*) thereafter, for the purpose of allotting the remaining reserved seats, beginning in the descending order with the ward having the highest percentage of population of the Scheduled Castes, one more seat in the ward, shall be allotted to the Scheduled Castes till all the seats to be reserved for the Scheduled Castes are allotted :

Provided that, the seats reserved under clause (b) shall be rotated, as far as possible, in the subsequent elections of the Corporation, to such wards in which only one seat had been previously reserved for Scheduled Castes until such reservation is provided in all the wards in the Corporation by rotation.

**4.** *Manner of allotment and rotation of seats reserved for the Scheduled Tribes.*—(1) For reserving seats of Councillors for the persons belonging to the Scheduled Tribes, the wards shall be first arranged in descending order, beginning with a ward where the percentage of population of the Scheduled Tribes with regard to the total population of such ward is the highest.

(2) Where the number of seats of Councillors to be reserved for the persons belonging to the Scheduled Tribes is equal to or less than the number of wards in a Corporation, one seat in each ward shall be allotted to the Scheduled Tribes, beginning in the descending order with the ward having the highest percentage of population of the Scheduled Tribes:

Provided that, the seats reserved under this sub-rule shall be rotated, as far as possible, in the subsequent elections of the Corporation, to such wards in which no such seat had been previously reserved for Scheduled Tribes until such reservation is provided in all the wards in the Corporation by rotation.

(3) Where the number of seats of Councillors to be reserved for the persons belonging to the Scheduled Tribes is more than the number of wards in a Corporation,—

(*a*) then firstly, one seat in each ward shall be allotted for the Scheduled Tribes; and

(*b*) thereafter, for the purpose of allotting the remaining reserved seats, beginning in the descending order with the ward having the highest percentage of population of the Scheduled Tribes, one seat in the ward, shall be allotted to the Scheduled Tribes till all the seats to be reserved for the Scheduled Tribes are allotted :

Provided that, the seats reserved under clause (b) shall be rotated, as far as possible, in the subsequent elections of the Corporation, to such wards in which only one seat had been previously reserved for Scheduled Tribes until such reservation is provided in all the wards in the Corporation by rotation.

**5.** *Manner of allotment and rotation of seats for Backward Class of Citizens.*— (1) The seats of Councillors to be reserved for Backward Class of citizens shall be allotted to the wards in the following manner, namely :—

(*a*) firstly, one seat in each ward shall be allotted for the Backward Class of citizens :
Provided that, if two seats are already reserved in all for the Scheduled Castes and Scheduled Tribes in a ward having three seats, then such ward shall not be considered for the allotment of a seat for the Backward Class of citizens under this clause and the clause (*b*);

(*b*) the remaining seats, if any, to be reserved for the Backward Class of citizens shall be allotted in the following manner, namely :—

(*i*) Where there is a ward with five seats and, in all, not more than two seats are reserved in that ward for the Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of citizens, then one more seat of the Backward Class of citizens shall be allotted to that ward;

(*ii*) After allotment of seats as provided in clause (*a*) and sub-clause (i), if there are still some more seats to be allotted for the Backward Class of citizens, then seats shall be allotted by drawing of lots from amongst those wards where at least three seats have remained unreserved;

(*iii*) After allotment of seats as provided in clause (*a*) and sub-clause (*ii*), if there are still some more seats to be allotted for the Backward Class of citizens, then seats shall be allotted by drawing of lots from amongst those wards, where at least two seats have remained unreserved.

(*iv*) After allotment of seats as provided in clause (*a*) and sub-clause (*iii*), if there are some more seats to be allotted for the Backward Class of citizens, then seats shall be allotted by drawing of lots from amongst those wards where at least one seat has remained unreserved.

(2) The seats so reserved for the Backward Class of citizens shall be rotated, as far as possible, in the subsequent elections of the Corporation, to such wards in which no seat had been reserved in the previous elections for the Backward Class of citizens until such reservations is given by rotation in each of the ward in the Corporation.

**6.** *Manner of allotment and rotation of seats for women*.—(*1*) The number of seats of Councillors to be reserved for women in a ward shall be as under :—

(*a*) In the wards having three or four seats, two seats shall be reserved for women :

Provided that, in a Corporation having two wards of three seats each, in one ward with three seats, two seats shall be reserved for women and in the other ward with three seats, one seat shall be reserved for women, and the selection of ward from amongst the two wards with three seats, which shall have two seats for women, in the first election shall be decided by drawing the lots from those two wards and the situation would be reversed in the subsequent election;

(*b*) In a ward having five seats, three seats shall be reserved for women.

(*2*) The seats to be reserved for women belonging to the Scheduled Castes and Scheduled Tribes shall be reserved, subject to the provisions of second proviso to sub-section (*1*) of section 5A and sub-rule (*1*), in the following manner :—

(*a*) firstly, the seats to be reserved for women belonging to the Scheduled Castes shall be allotted by drawing lots from amongst the wards having the seats reserved for the Scheduled Castes;

(*b*) thereafter, the seats to be reserved for women belonging to the Scheduled Tribes shall be allotted by drawing lots from amongst the wards having the seats reserved for the Scheduled Tribes.

(*3*) The seats to be reserved for women belonging to the Backward Class of citizens shall be Reserved, subject to the provisions of sub-rule (*1*), in the following manner, namely :—

(*a*) firstly, in a ward, where two seats are reserved for the Backward Class of citizens, one seat shall be reserved directly for women belonging to the Backward Class of citizens;

(*b*) thereafter, in a ward, where there are one or more seats reserved for either the Scheduled Castes or the Scheduled Tribes or both, but not reserved for women belonging to that category, then, the seat reserved for the Backward Class of citizens in such ward shall be reserved for women;

(*c*) after the seats are so allotted, if any seats remain to be reserved for women belonging to the Backward Class of citizens, then such seats shall be allotted by drawing of lots from amongst the remaining wards, excluding those wards where seats are reserved for the Backward Class of citizens under clause (*a*) and clause (*b*), but not having five seats, and also excluding those wards where the seats are already reserved for women up to the numerical limit prescribed for such reservation under sub-rule (1).

(*4*) Once the seats are reserved in the appropriate wards for women belonging to the Scheduled Castes, Scheduled Tribes and the Backward Class of citizens, then the remaining seats to be reserved for women shall be allotted in various wards up to the numerical limit prescribed for such reservation under sub-rule (1).

(5) The seats reserved for the Women in a particular category shall be allotted by rotation, as far as possible, in the subsequent elections to the Corporation to the wards where no such seat was allotted to women in that category in the previous elections of the Corporation till all the wards are allotted such reservation by rotation.

**7.** *First election for rotation*.—For the purposes of rotation of seats under these rules, the general election held after commencement of these rules shall be considered as the first election.

**8.** *General Provisions*.— Where, while allotting the seats to the Scheduled Castes, Scheduled Tribes or Backward Class of citizens, more than fifty per cent. of the seats in a ward are reserved, then endeavor shall be made, in subsequent election, to rotate such seats in other wards of the Corporation.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRIYANKA KULKARNI-CHHAPWALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.